FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

0154141

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे प्र. वि. मुंबई पहिली खबर क्र. 33, वर्ष 2023, दिनांक 02/06/2023
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलमे Sections 7
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार, तारीख पासून 29/05/2023 वेळ 14:00, तारीख पर्यंत 02/06/2023 वेळ 16:33
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 30/05/2023, वेळ 16:30
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 06/2023, तारीख 02/06/2023 वेळ 02:40
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव आयुक्त दुग्ध विकास कार्यालयाच्या समोरील परिसर ठिकाणाचे नंबर No. if any गल्ली Ward रस्त्याचे नाव Name of road
Address of Occurrence Name
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण वरळी सी-फेस, गाव Village, पोस्ट वरळी Post, तालुका Taluka, जिल्हा मुंबई 400018 Dist., राज्य महाराष्ट्र State
Nearest identifiable place
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव रईस अन्सारी (b) वडिलांचे / पतीचे नाव यासीन अन्सारी
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 40 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9869483930
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........, दिल्याचा दिनांक ........, दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय डेअरी फार्म
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता 608, गल्ली / वार्ड नं. डी-विंग-1, घर / नाव नं. रॉयल पाम, आरे फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव मिल्क कॉलनी, जवळचे प्रसिद्ध ठिकाण गोरेगाव, पूर्व, गाव मुंबई-400065, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........, सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर येऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach seperate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

श्री उल्हास दाजी तुकसे, वय 48 वर्षे, धंदा- नोकरी, पद- उप मुख्य दक्षता अधिकारी नेमणूक- आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी सी-फेस, वरळी, मुंबई-18
रा. डी- बिल्डींग, रूम नं 96, सुपरु क्वार्टर्स, वरळी, सी-फेस, वरळी, मुंबई 400018

(G.P.-800 Reg.-(25×8=150 Lvs.)-2-2018-RA3-(K) 828

आलीम सिद्दीकी रईस यासीन अन्सारी, रा.रू. ६०८, डायमंड १, रॉयल पाम आरे, मिल्क कॉलनी, गोरेगांव (पूर्व) मुंबई- ६५ यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(शैलेंद्र चव्हाण)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

(रईस यासीन अन्सारी)

# फिर्याद

दिनांक— ०३/०८/२०२१.

मी रईस यासीन अन्सारी, वय ४० वर्षे, धंदा— रिअल इस्टेट एजंट, रा.ठी. ६०८, डायमंड १, रॉयल पाम, आरे मिल्क कॉलनी, गोरगाव (पुर्व), मुंबई— ६५. आधार कार्ड क्र. २८७८ ०४७४ ९६७०, मो.क्र. ८१६९४८३१३९.

---

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियासह रहात आहे. मी अन्सारी प्रॉपर्टी या नावाने रिअल इस्टेट एजंटचा व्यवसाय करीत असून त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

माझ्या मालकीचे गोरेगाव आरे कॉलनी येथे युनिट २९, आरे मिल्क कॉलनी, मयूर नगर, मुंबई येथे बैठया चाळीत घर व दुकान आहे. सदरचे घर व दुकान मी भाडे करारावर दिलेले आहे.

दिनांक १२/०७/२०२१ रोजी आरे दुग्ध विभागाचे अधिकारी श्री. तुळसे हे माझे नमुद भाडयाने दिलेल्या घर व दुकान असलेल्या युनिट नं. २९ येथे आले व माझ्या घराचे व दुकानाचे फोटो काढले तेव्हा त्यांचे सोबत आरे कॉलनीमध्ये राहणारे पत्रकार श्री. निलेश पुरी हे होते. अशी माहिती मला माझ्या भाडेकरूने दिली.

त्यांनतर दिनांक २८/०७/२०२१ रोजी श्री. तुळसे यांनी मला फोन केला व माझे युनिट नं. २९ येथील घर व दुकानासंदर्भात तक्रार आली आहे व नमुद घर व दुकानाचे कागदपत्रे घेवुन वरळी येथील कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानुसार मी दिनांक २९/०७/२०२१ रोजी माझे नमुद घर व दुकानाचे कागदपत्रे घेवुन श्री. तुळसे यांना भेटण्यास त्यांचे वरळी सी—फेस, मुंबई येथील कार्यालयात गेलो. त्याठिकाणी मला श्री. तुळसे हे भेटले, त्यांनी मला सांगितले की, ते आरे डेअरी येथील उप मुख्य दक्षता अधिकारी आहेत. त्यानंतर त्यांनी माझे नमुद घर व दुकानाचे कागदपत्रे दाखविण्यास सांगितली, त्याप्रमाणे मी त्यांना माझे नमुद घर व दुकाना संदर्भातील कागदपत्रे दाखविली. सदर कागदपत्रांची तपासणीकरून सदर कागदपत्रे योग्य नसुन, सदरचे घर व दुकान हे अनधिकृत असल्याबाबत त्यांनी मला सांगून "तुम्हाला रू. २५,०००/— दयावे लागतील नाहीतर, नमुद घर व दुकान अनधिकृत असल्याबाबत कारवाई करण्यात येईल" असे सांगितले.

त्यावेळी मला खात्री झाली की, नमुद लोकसेवक अधिकारी हे माझ्याकडे लाचेची मागणी करत आहे. परंतु मला त्याना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे दि.३०/०७/२०२१ रोजी सायंकाळी हजीर मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक शैलेंद्र चव्हाण यांनी मला लोकसेवक श्री.तुळसे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार अर्ज देण्यास सांगितले. मला लिहीता येत नसल्यामुळे पो.नि. चव्हाण यांनी त्यांचे संगणकावर माझी तक्रार मराठीतुन टाईप केली व ती वाचुन मी त्यावर सही केली.

त्यानंतर दिनांक ०२/०८/२०२१ रोजी सकाळी ०९:०५ वा.चे दरम्यान लोकसेवक अधिकारी श्री. तुळसे यांचा मला फोन आला व त्यांनी मला भेटण्यास बोलाविले. सदरची माहिती मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, मुंबई येथे सकाळी १३.०० वाजता दरम्यान येवून पो.नि. चव्हाण यांना सांगितली. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी मला पुढे करण्यात येणाऱ्या

पडताळणी कारवाईबाबत थोडक्यात माहिती समजावुन सांगितली. व तेथे हजर असलेले सपोआ संजय पाटील हे नमुद पडताळणी कारवाई दरम्यान पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन काम पाहणार असल्याचे सांगितले. त्यांनतर पोनि चव्हाण यांनी दोन शासकीय पंचांना व पडताळणी पथकाला पाचारण केले. त्यांनतर पोनि चव्हाण यांनी दोन शासकीय पंचांची ओळख करून दिली. त्यावर पोनि चव्हाण यांनी पंचांना माझे तक्रार अर्जा संदर्भात थोडक्यात हकिकत सांगुन तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि चव्हाण यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि चव्हाण यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यांनतर पोनि चव्हाण यांनी मला पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टच्या आतील असलेल्या बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून माझे व लोकसेवक यांच्यातील होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी मला व पंच क्र.१ पाटील यांना पडताळणी कारवाई बाबत योग्य त्या सुचना दिल्या, त्यावेळी पो.नि. चव्हाण यांना सांगितले की, लोकसेवक श्री. तुळसे यांनी मला एकटेच येण्यास सांगितले आहे व पंच श्री. पाटील हे माझे सोबत आल्यास लोकसेवकास संशय येईल व लोकसेवक लाचेची मागणी करणार नाही. त्यामुळे पोनि चव्हाण यांनी पंच श्री. पाटील यांना सुचना दिल्या की, माझे पासून काही अंतरावर कोणासही संशय येणार नाही असे थांबून शक्य होईल तितके माझे व लोकसेवक तुळसे यांच्यातील होणारे संभाषण ऐकण्याचा प्रयत्न करावा. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर हु. १४:१८ वा. चालु केला व माझ्या शर्टच्या आतील बनियनला लावुन मी लोकसेवक श्री. तुळसे यांची भेट घेण्याकरीता त्यांचे वरळी सी–फेस, मुंबई येथील कार्यालयात माझी खाजगी कार क्र. एमएच–०२–बीजे–५९४८ मधून निघालो. माझे पाठोपाठ शासकीय वाहन क्र. एमएच.०४.एएन.३६०८ मधुन पोनि चव्हाण, सपोआ पाटील, पंच श्री. पाटील, पोना गावडे, चंदनशिवे, मिरगणे, हे देखील लोकसेवकाच्या कार्यालयाच्या दिशेने निघाले.

मी माझे खाजगी वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालयात गेलो असता, तेथे लोकसेवक श्री. तुळसे हे त्यांचे कक्षात हजर होते. मी लोकसेवक श्री. तुळसे यांचे कक्षात गेल्यावर तेथे त्याची भेट घेतली. त्यावेळी पंच श्री. पाटील हे कार्यालयाच्या बाहेर थांबुन राहीले. त्यानंतर लोकसेवक तुळसे व माझ्यात माझे युनिट नं. २९ येथील घर व दुकानाच्या कागदपत्रा संदर्भात बोलणे झाले. त्यादरम्यान लोकसेवक तुळसे यांनी माझे नमूद घर व दुकानावर कारवाई न करण्याकरीता एका कागदावर पेन्सीलने २५,०००/– इतका आकडा लिहून दाखविला त्यावर मी लोकसेवक तुळसे यांस 'पंचवीस हजार' असे विचारले असता, त्यांनी मला हळु आवाजात बोल असे सांगितले. तेव्हा मी लोकसेवक श्री. तुळसे याना बोललो की, आता मी रू. १०,०००/– देतो व उर्वरित रू.१५,०००/– तीन दिवसांनी आणुन देईन असे म्हणालो असता, त्यावेळी लोकसेवक श्री. तुळसे यांनी मला 'हां' असे बोलुन माझेकडे लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर मी लोकसेवकाच्या कार्यालयाच्या बाहेर आलो व कोणासही संशय येणार नाही अशा रितीने माझे खाजगी वाहनाने थांबलेल्या शासकीय वाहनाजवळ परत आलो. माझे पाठोपाठ पंच श्री. पाटील देखील पायी चालत शासकीय वाहनाजवळ परत आले.

त्यानंतर पोनि चव्हाण यांनी शासकीय वाहनातच व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद केला व झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामधील संभाषण ऐकुन लोकसेवक यांची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने व लोकसेवक यानी लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर पोनि चव्हाण यांनी मला लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितली. म्हणुन मी माझे वैयक्तिक बचतीमधुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १०,०००/— (रू. ५००/— दराच्या २० भारतीय चलनी नोटा) पोनि चव्हाण यांचे ताब्यात दिल्या. पोनि चव्हाण यांचे आदेशान्वये पथकातील एका अंमलदारास नमुद नोटांचे क्रमांक एका कागदावर लिहुन घेण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि. चव्हाण यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोलीस अंमलदार वाहन चालक श्री. चिंचोळकर यांनी पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावली व अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. व माझे शर्टाच्या डाव्या बाजुस असलेल्या खिशात अलगद ठेवली व ते सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि चव्हाण यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझा डावा हात केसांवरून फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबुन पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोनि चव्हाण यांनी दु. १६:१६ वा. पुन्हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु केला व माझे बनियनच्या आतील बाजुस लावुन सापळा कारवाईकरीता लोकसेवक श्री. तुळसे कार्यरत असलेल्या वरळी सी—फेस, मुंबई येथे माझे खाजगी वाहनाने पाठविले. माझे पाठोपाठ पंच श्री. पाटील, पंच श्री. जगताप यांचे सह पोलीस पथक काही अंतर ठेवुन वरळी सी —फेस रस्त्यावर थांबून राहीले. त्यानंतर मी माझे कारच्या बाहेर उभा राहुन लोकसेवक श्री. तुळसे यांस त्यांचे मोबाईल वर दोन वेळा संपर्क केला असता, त्यांनी तो रिसीव्ह केला नाही. म्हणुन मी पो.नि. चव्हाण यांना कॉल करून लोकसेवक तुळसे कॉल रिसीव्ह करीत नसलेबाबत सांगितले. काहीवेळाने लोकसेवक श्री. तुळसे हे कार्यालयाच्या बाहेर येताना मला दिसले. तेव्हा मी श्री. तुळसे यांना भेटलो असता, मी त्यांच्याशी माझे कामासंदर्भात बोलणे केले. त्यानंतर लोकसेवक श्री. तुळसे यांनी मला एक अर्ज करण्यास सांगून त्यामध्ये मी घराचे कोणतेही नवीन बांधकाम केलेले नसून, फक्त घराचे रिपेरिंगचे काम केले असल्याचे नमूद करण्यास सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक श्री. तुळसे यांस रू. १०,०००/— इतकी रक्कम आणली असल्याचे सांगून बाकी रू.१५,०००/— नंतर आणुन देतो असे सांगितले. त्यावर लोकसेवक तुळसे यांनी 'कोई दिक्कत तो नही' असे बोलून लाचेची रक्कम घेण्यास तयारी दर्शविली म्हणून माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १०,०००/— (रू. ५००/— दराच्या २० भारतीय चलनी नोटा) लोकसेवक श्री.तुळसे यांचेकडे दिली असता, लोकसेवक श्री. तुळसे यांनी ती उजव्या हाताने स्विकारून डाव्या हातात ठेवली. त्यानंतर लोकसेवक श्री. तुळसे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यावर आजुबाजुस सापळा लावुन असलेल्या सापळा पथकास दिसेल अशारीतीने मी माझा डावा हात केसांवर फिरवून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक श्री. तुळसे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

माझे मालकीचे युनिट २९, आरे मिल्क कॉलनी, मयूर नगर, मुंबई येथील घर व दुकानाची कागदपत्रे अयोग्य आहे असे सांगून नमूद घर व दुकानावर अनधिकृत असल्याची कारवाई न करण्याकरीता आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, वरळी सी–फेस, मुंबई येथील कार्यालयातील लोकसेवक उदास तुळसे, उप मुख्य दक्षता अधिकारी यांनी माझे कडे दि. ०२/०८/२०२१ रोजी रू.२५,०००/– लाचेची मागणी केली व त्यातील पहीला हफ्ता म्हणून रू. १०,०००/– इतकी लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्याचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक उदास दाजी तुळसे, उप मुख्य दक्षता अधिकारी, आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, वरळी सी–फेस, मुंबई यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मला हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( शैलेन्द्र चव्हाण )
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ ......

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

...... — ......

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... — ......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ...... — ......

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमुद फिर्यादी ह्यांचे आरे मिल्क कॉलनी, गोरेगाव, मुंबई मध्ये स्वतःचे मालकीचे घर व दुकान आहे. सदर घर व दुकानाबाबत आरोपी यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली होती. फिर्यादी यांनी घर व दुकानाची कागदपत्रे आरोपी यांना नेऊन दाखवली असता सदर कागदपत्रे योग्य नसल्याने सदर घर व दुकान अनधिकृत असल्याबाबत कारवाई करण्यात येईल सदरची कारवाई टाळण्याच्या मोबदल्यात फिर्यादीकडे रु २५०००/- लाचेची मागणी केली व पहिला हप्ता रु १०,०००/- लाचेची मागणी करून ते स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो.नि. शैलेंद्र चव्हाण. ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ...... Rank ...... No. ...... to take up the investigation or

(2) Refused investigation due to ...... (3) Transferred to P. S. ...... District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb Impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name शैलेंद्र चव्हाण

पदनाम Rank पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई.

तपासिक अ. चा कोड क्र. ......

Posting

Code No. of I.O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......

1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to: 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report